# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका

संपादक

प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे



८५. शाहूंची सामाजिक न्याय संकल्पना आणि
त्याची प्रासंगीकता
शीतल सदाशिव गायकवाड .................................. ५३०

८६. सामाजिक सुधारणांमधील छत्रपती
राजर्षी शाहू महाराजांची भूमिका
रवी अंजीरराव सुरवसे .................................. ५३७

८७. छत्रपती राजर्षी शाहू महाराज आरक्षण धोरण
सोनाली सुग्रीव सुरवसे, ऋतुजा नेताजी भोईबार .................. ५४०

८८. Education for Socio-Economic Changes:
Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj
**Dr. Prakash Ratanlal Rodiya** .......................... ५४७

८९. Attitude of Rajarshi Shahu Maharaj towards Brahmanism
**Shrikrishna Panchal** .................................. ५५३

९०. Reservation Policy of Rajarshi Shahu Maharaj
**Dipeeka Swami** ....................................... ५६१

९१. Educational Revolution in Kolhapur Princely State
**Dr. Rahul Vasantrao More** ............................. ५६५

९२. Chhatrapati Rajarshi Shahu Maharaja :
An Educational Reformist
**Mr. Junjate Gajanand Mohan** ........................... ५७०

○○○

# ८७

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज आरक्षण धोरण

□□□

**सोनाली सुग्रीव सुरवसे, ऋतुजा नेताजी भोईबार**

महाराजांच्या व्यक्तिमत्वाचा व त्यांच्या विविध क्षेत्रांतील कामगिरीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. महाराजांनी आपल्या हयातीत अनेक चळवळी उभ्या केल्या; अनेक चळवळींचे नेतृत्त्व केले. तर अनेक चळवळींना प्रेरणा व साहाय्य केले. अशा वेदोक्त चळवळ, वसतिगृह चळवळ, प्राथमिक शिक्षण चळवळ, अस्पृश्योद्धार चळवळ, जातिभेद-निर्मूलन चळवळ, भटक्या-विमुक्त जातींच्या उद्धाराची चळवळ, सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, कामगार चळवळ इत्यादी अनेक चळवळींचा हा मागोवा आहे. या चळवळी चालवीत असता त्यांना तत्कालीन ब्राह्मणी नेतृत्वाशी व प्रवृत्तीशी तीव्र संघर्ष सातत्याने करावा लागला. बहुजनाच्या उद्धाराच्या व प्रगतीच्या या चळवळी करीत असता महाराजांच्या हयातीतच 'शाहू महाराज सत्यशोधकी की आर्यसमाजी' 'शाहू महाराज स्वराज्यद्रोही की स्वराज्योपासक' अशा प्रकारचे वाद निर्माण झाले.


विद्याहिन, धनहिन आणि सत्ताहीन बहुजन समाजाच्या दुःखाला वाचा फोडणारा वाली म्हणून छत्रपती शाहू महाराज कोल्हापूरची शाहू व चौथे शाहू या महाराष्ट्राला लाभले. २६ जून १८७४ मध्ये महाराष्ट्राला नव्याने सूर्यकिरण लाभून देणारे शाहू महाराज यांचा जन्म कोल्हापूर येथील कागल गावांमधील घाटगे परिवारात झाला.

भारतीय समाज सुधारक व कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती इसवी सन १८८४ ते १९२२ दरम्यान होते. ब्रिटिश राज सत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले. सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना राजर्षी ही पदवी कानपूरच्या

कुर्मी समाजाने दिली. महाराष्ट्रातील तीन प्रमुख समाजसुधारकांच्या वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यात फुले शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात. या लेखांमध्ये आपण छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आरक्षण धोरण सामाजिक न्याय याविषयी सविस्तर माहिती पाहणार आहोत .

**जीवन परिचय :-**

महाराष्ट्राचा इतिहासातील एक अमूल्यरत्न म्हणून लाभलेल्या शाहू महाराज जयसिंगराव घाटके आणि राधाबाई यांचे पुत्र होते. शाहू महाराजांचा जन्मानंतर तीन वर्षांनी राधाबाई यांचे निधन झाले. शाहू महाराज यांचे दहा वर्षापर्यंत त्यांचे शिक्षण आणि बालपोषणाची जबाबदारी त्यांच्या वडिलांनी पार पाडली. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी यांचे निधन झाले आणि मग त्यांची विधवा पत्नी आनंदीबाई यांनी शाहू महाराजांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले आणि त्यांचे नाव शाहू असे ठेवले शाहू महाराजांचा १८९४ मध्ये राज्याभिषेक झाला.




कृष्णाजी भिकाजी गोखले व हरिपंत गोखले हे त्यांचे शिक्षक होते.

**शिक्षण –**

१८८५ मध्ये महाराजांना राज कोट येथील राजकुमार महाविद्यालयात पाठवण्यात आले. १८९० ते १८९४ या काळात महाराजांचे शिक्षण धारवाड येथे पूर्ण झाले. या ठिकाणी सर स्टुअर्ट फ्रेझर व सर रघुनाथराव व्यंकोजी सबनीस हे त्यांचे गुरु होते .तेथे महाराजांनी इंग्रजी भाषा जगाचा इतिहास व राज्यकारभार या विषयाचे शिक्षण घेतले. १८८९ मध्ये इंग्रजांनी महाराजांचे ट्यूटर व गार्डियन म्हणून नियुक्ती केली. १८९४ पर्यंत या पदावर होते.

१९२२ पर्यंत म्हणजेच तब्बल २८ वर्ष कोल्हापूर व राज्य केले. या काळामध्ये कोल्हापूरमध्ये खूप जास्त प्रमाणात सामाजिक सुधारणा केल्या दलित आणि मागासवर्गीयांसाठी लढा देण्यामध्ये त्यांचे मोठे श्रेय आहे. हे मूल्यमापन करण्यासाठी हा विषय निवडण्यात आला आहे.

आरक्षणाची सैद्धांतिक चौकट : -

**जातिव्यवस्था :-**

आपल्या सव्वीस वर्षाच्या कारकीर्दीच्या सुरुवातीपासूनच जातीसंस्थेच्या जोकडापासून समाजाची सुटका करून त्यांची उन्नती करणे हे शाहू महाराजांनी आपले जीवित कार्य ठरवले होते. प्रत्येक हिंदू व्यक्तीचा दर्जा तिच्या जातीवर अवलंबून असतो म्हणून धर्माधिष्ठित आणि परंपरापुनीत अशा या जातीसंस्थेची मुकाबला करण्याचे एक विराट कार्य महाराजांनी अंगावर घेतले .त्यातूनते तत्कालीन सामाजिक धार्मिक आणि राजकीय सुधारणा बाबतच्या व्यापक समस्या गोवले गेले.महाराजांसमोर परस्पर संलग्न दोन उद्दिष्टे होती.

१) बहुजन समाजातील शिक्षणाचा प्रसार

२) जाती संस्थेने उभारलेल्या माणसातील भिंती नष्ट करणे

महार मांगांना रूढी आणि कायदा या धंद्यामध्ये सर्वच दारी बंद होती त्यांना कमी लेखले जात होते त्यातून सर्व जाती धर्मांना त्यांचा दर्जा वाढवून देण्यासाठी सनदा देण्यात आल्या.

**शाहु महाराज कालीन जातीसंघटना :-**

**अपरिहार्य अनिष्ट :**

प्रत्येक जातीने आपापले संघटन करून स्वतःचे हक्क व न्याय अधिकार प्राप्त करून घेतल्याशिवाय अशा परिस्थितीत सामाजिक समतेचा गाडा पुढे जाणार नाही असे शाहूंची वास्तववादी भूमिका होती . कनिष्ठ जातीच्या हितासाठी व समाज हक्कासाठी वरिष्ठ जाती संघर्ष करणे स्वाभाविक नव्हते .

संघटना स्थापन करून समता व न्याय हक्कासाठी संघर्ष हाच व्यवहारात परिणामकारक मार्ग होता आपल्या कारकीर्दीत शाहूंनी संस्थानात व संस्थाना बाहेरही जाती संघटनेचा व जाती परिषदांचा धुमधडाका घडवून दिलेला होता . महाराष्ट्रात व संस्थानातही मराठा समाज बहुसंख्याक असल्यामुळे जाती संस्था घट्ट करणाऱ्या ब्राह्मण शाहीला उध्वस्त करण्याचे कार्य अग्रक्रमाने या समाजाकडे येत असल्यामुळे त्यांनी मराठा समाजाचा संघटना व परिषदा यांना सर्वाधिक उत्तेजना देणे साहजिक होते. दुसरी गोष्ट म्हणजे जाती संघटनेचा हितकर्ता शिल्पकार व नेता त्या जातीतील व्यक्तीचं असली पाहिजे हे जातीव्यवस्थेचे एक कटू वास्तव होते .

जोपर्यंत आमच्यामध्ये जाती हा मतभेद आणि मत्सर जिवंत आहे तोपर्यंत आम्ही आपापसात झगडत राहणार व आपल्या हितवृद्धीस अपाय करून घेणार असे शाहू महाराज म्हणतात . सर्व जातीच्या पुढार्यांना असे त्यांचे सांगणे आहे की ; दृष्टी दूरवर ठेवा पाया पुरते पाहू नका जातीभेद मोडणे इस्ट आहे , जरूर आहे जातीभेद पाळणे पाप आहे.

**वेदोक्त प्रकरण :-**

१८९९ च्या ऑक्टोबरच्या सुमारास शाहू महाराज कार्तिक स्नानास पंचगंगा नदीच्या तीरावर गेले त्यांच्यासोबत बंधू बापूसाहेब महाराज मेहुणी मामासाहेब खानविलकर स्नेही राजाराम शास्त्री भागवत अशी मंडळी होती स्नानाच्या वेळी मंत्र म्हणणार नारायण भजी स्नान चालू असता भजी मंत्र म्हणत होता. प्रखंड पंडित असलेला राजाराम शास्त्रीचे भटजीच्या मंदिराकडे लक्ष गेले. भटजी स्नान न करताच वेदोक्त मंत्रा ऐवजी पुराणोत्तक मंत्र उच्चारास उच्चारत होता. छत्रपती वेदोक्त मंत्राचे अधिककारी असता हा भटजी पुराने युक्त मंत्र म्हणत असल्याचे राजाराम शास्त्रीने शाहूच्या नजरेस आणून दिल्यावर त्यांनी त्यास जाब विचारला तेव्हा भटजींनी वेदोक्त मंत्र म्हणताना स्नानांची गरज असते परंतु या शुद्रांना पुराणुक्त पद्धतीच्या अनुग्रह करावयाचा असल्याने मला स्नानांची आवश्यकता नाही. त्या भटजीचीही अभद्रवाणी आकाशातून वज्रघात व्हावा त्याप्रमाणे महाराजांच्या अंगावर कोसळली.क्षत्रिय कुलावतंस हिंदू पदे पाच-सहा अशी बिरुद्धवली असणारा छत्रपती यः त्कश्चितशूद्र म्हणून हिनवणी ही कल्पना सहन करण्या पलीकडे होती. वेदोक्त्याच्या ठिणगीचे रूपांतर सामाजिक वनव्यात झाले आणि पुढे त्या वनव्याचे रूपांतर सामाजिक न्यायाच्या चळवळीत

झाले .भगवंतराव पाळेकर यांनी त्यांच्या ' जागृती ' वृत्तपत्रातून कोल्हापूरचे वेदोक्त प्रकरण म्हणजे 'मागासलेल्या जातीच्या जोरदार मोहिमेचे पहिले रणशिंगच होय ' असे म्हणतात

**आरक्षणाची सुरुवात:-**

**१) १९०२ चा क्रांतिकारी जाहीरनामा :-**

राजर्षी शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी काढला. हा जाहीरनामा कोल्हापूर गॅझेट मध्ये प्रसिद्ध झाला त्यानंतर आरक्षणाला सुरुवात झाली .शाहू महाराजांची अठरापगड जातींना आरक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर डॉक्टर बी आर आंबेडकर यांनी आरक्षणाला घटनात्मक संरक्षण दिले.

धनंजय कीर नवीन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदूत. महाराज सरकारला असा हुकूम करतात की हा हुकूम पोहोचलेला तारखा पासून टिकत झालेला जागांपैकी शेकडा ५० जागा मागासलेल्या लोकांस भराव्या ऑफिसचे मागासलेल्या वर्गाच्या अंमलदाराचे प्रमाण स सध्या शेकडा ५० पेक्षा कमी असेल तर पुढची नेमणूक या वर्गातील व्यक्तीच करावी. या हुकुमाच्या प्रसिद्धीनंतर केलेल्या सर्व नेमणुकांचे तिमाही पत्र प्रत्येक खात्याच्या मुख्याने सरकारकडे पाठवले मागासलेल्या वर्णाचा अर्थ ब्राम्हण ,प्रभू ,शेणवी ,पारशी व दुसरे पुढे असलेले वर्ण खेरीज करून सर्व वर्ण असा समजावा.

**आरक्षणाची गरज :-**

धर्म राज्य भेद मानवा नसावे । सत्याने वागावे । ईशासाठी ।। ख्रिस्त, महंमद, मांग, ब्राह्मणाशी । धरावे पोटाशी । बंधू परी ।। निर्मीकाचा धर्म सत्य आहे एक । भांडणे अनेक । कशासाठी ?

महाराजांच्या बहुजनांना आरक्षण देण्याच्या निर्णयावर अभयंकर नावाच्या एका वकिलाने आक्षेप , तुम्ही आरक्षण कुठल्या न्यायाने दिले असा सवाल केला.घोड्याच्या पागेत बसलेल्या शाहू महाराजांनी वकीलाला एक प्रयोग करून दाखवला . त्यात त्यांनी घोड्यासाठी जमिनीवर चंदी टाकायला सांगितली .सगळीकडे चंदी टाकण्यात आली ती चंदी फक्त धष्टपुष्ट घोड्यांनीच खाऊन आली अशक्त कमजोर लुळीपांगळी तसेच मागे राहिली. यावरून आरक्षण धोरण हे अशा लोकांसाठी आहे, जे लोक धष्टपुष्ट नाहीत कमजोर कुमकवत आहेत अशा लोकांसाठी आहे धष्टपुष्ट ताकतवान घोडी कमजोर कुमकुम

घोड्यांना खाऊच देत नाही अशा कुमकुवत लोकांना आरक्षणातून संधी दिली जाते.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर शाहू महाराजांच्या या धोरणांना आरक्षणाचा घटनात्मक मार्ग दाखवला.

इंदिरा सहाणी खटला ५० % आरक्षण

**महार वतने बंद :-**

त्यांना मिळालेला इनाम जमिनीस हडकी हाडोळा म्हणत असत .त्यांच्या वतनाला सामाजिक प्रतिष्ठा नव्हती उलट वतनामुळे महाराजांना पाटील कुलकर्णी चौगुला व रयतीच्या २४ तास पडले ती कामे करावी लागत. १९१८ मध्ये शाहू महाराजांनी ही वतने कायद्याने बंद केली. तसेच वेटवरळ ही पद्धत देखील बंद केली. पुढे १९५८ मध्ये महाराष्ट्राचे राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी एक कायदा करून महारकीच्या वतनाचा शेवट केला.

महाराष्ट्रातील प्रवर्गनिहाय आरक्षण

| प्रवर्ग | संक्षिप्त नाव | आरक्षण | जाती | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | एससी | १३% | ५९ यादी | १,३२,७५,८९८ (११.८१%) |
| अनुसूचित जमाती | एसटी | ७% | ४७ यादी | १,०५,१०,२१३ (९.३५%) |
| इतर मागास वर्ग | ओबीसी | १९% | ३४६ यादी | |
| विशेष मागास प्रवर्ग | एसबीसी | २% | ७ | |
| विमुक्त जाती – अ | व्हीजे – ए | ३% | १४ | |
| भटक्या जाती – ब | एनटी – बी | २.५% | ३७ | |
| भटक्या जाती – क | एनटी – सी | ३.५% | १ (धनगर) | ९% |
| भटक्या जाती – ड | एनटी – डी | २% | | |
| आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग | ईडब्ल्युएस | १०% | | |
| एकूण | | ६२% | | |

**आरक्षणावरील टीका :-**

१) लोकमान्य टिळक 'मराठा' प्रशासनातील ५० टक्के जागा मागासवर्गीयांसाठी राखीव करून महाराजांना आपल्या मराठा जातीभाईंना कारभारात प्राधान्य द्यायचे आहे. असा त्यांच्यावर उघड आरोप करण्यात आला.

२) ब्राह्मणी वृत्तपत्र पक्षपातीपणाचा आरोप असा करण्यात आला.

**शोधनिबंधांची उद्दिष्टे :-**

१) राजर्षी शाहू महाराजांचे आरक्षण धोरणांचा अभ्यास करून ते विचार समजून घेणे.

२) आरक्षणा संबंधित धोरणांचा आढावा घेणे.

३) बहुजन समाजासाठी च्या सामाजिक न्यायचा आढावा घेणे.

४) राजर्षी शाहू महाराजांचे आरक्षणाचे उद्दिष्ट स्पष्ट करणे.

**निष्कर्ष :-**

१) जाती व्यवस्था ही अशी इमारत आहे ज्यात पायऱ्या नाहीत म्हणून खालच्या जातीतील कितीही गुणवंत असला तरी त्याला वरपर्यंत कधीच जाता येणार नाही आणि वरच्या जातीतला कितीही नीच असेल तर तो तिथेच राहील यासाठी आरक्षणाचा मुद्दा आणण्यात आला

२) समाजातील दलितांना न्याय देण्यासाठी शाहू महाराज्यांनी काळाच्याही पुढे जाऊन धडाडीने प्रभावी उपाय अमलात आणली.

३) मागासवर्गीयांना ५० टक्के आरक्षण

**संदर्भ सूची :-**


१) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ - जयसिंगराव पवार

२) राजर्षी शाहू - जीवन कार्य जयसिंगराव पवार

३) https://mr.m.wikipdia.org

४) समाजसुधारक - समाधान महाजन



**सोनाली सुग्रीव सुरवसे**

**ऋतुजा नेताजी भोईबार**

एम. ए. प्रथम वर्ष - राज्यशास्त्र विभाग

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर


OOO